साप्ताहिक

“एकच ध्येय... एकच आवाज”

PRGI No. MAHMAR / 25 / A5304
पोस्ट परवाना नं. : DHL/642/2026-28

# प्रजा न्याय

संपादक – संजय अण्णा कुसळकर

Mob. : 9422798093 / 9028136953
Email - kusalkars@gmail.com
prajanyay@gmail.com

वर्ष-१ले | अंक २९ वा | सोमवार, दि. ०३/०८/२०२६ ते दि. ०९/०८/२०२६ | पाने ४ | किंमत ३ रुपये

## अक्कलकोस गावाचा विकासाचा अनुशेष भरून काढणार–पालकमंत्री जयकुमार रावल

## गावकऱ्यांशी साधला चावडी संवाद; अडचणी जाणून घेत तातडीने सोडवण्याचे दिले आश्वासन





धुळे (जिमाका) – अक्कलकोस गावाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शासन कटिबद्ध असून, गावातील मूलभूत सुविधांचा अनुशेष भरून काढण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार रावल यांनी दिली. अक्कलकोस येथे आयोजित चावडी संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश इंगळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुरज जगताप, उपविभागीय अधिकारी शरद मंडलिक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक राजन पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्नेहा पवार, प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, सरपंच उज्वलबाई जाधव तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री श्री. रावल म्हणाले की, राज्यपालांच्या दौऱ्याच्या निमित्ताने अक्कलकोसच्या विकासाला अधिक गती मिळाली आहे. यापुढे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे गावाचे पालकत्व सोपविण्यात आले असून, दर चार महिन्यांनी विकास कामांचा आढावा घेतला जाईल. जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांच्या समन्वयातून पायाभूत सुविधांचा टप्प्याटप्प्याने विकास केला जाईल. देशाचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास साधायचा असेल तर ग्रामीण भागाचा विकास अपरिहार्य आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. लोकांप्रती उत्तरदायी राहून काम करणे हीच खरी लोकसेवा असल्याचे त्यांनी सांगितले. गावात नवीन डांबरी रस्ते, शाळा व अंगणवाडी इमारतींची दुरुस्ती व रंगरंगोटी, धरणापर्यंतचा रस्ता, साठवण बंधारे तसेच इतर विकासकामे पूर्ण झाली असून, उर्वरित रस्त्यांची कामे प्रगतीपथावर असल्याची माहिती त्यांनी दिली. आश्रमशाळेच्या नवीन इमारतीचे काम दर्जेदार व वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला दिले. शबरी आवास योजनेअंतर्गत घरे, विहिरी आणि इतर विकासकामांमुळे गावात सकारात्मक बदल होत असल्याचे नमूद करत त्यांनी ग्रामस्थांच्या समस्या, अपेक्षा आणि सूचना चावडी संवादातून जाणून घेत त्या प्राधान्याने सोडविण्याचे आश्वासन दिले. यावेळी पालकमंत्री श्री. रावल यांच्या हस्ते बिरसा मुंडा सभागृहाचे लोकार्पण, साठवण बंधाऱ्याचे लोकार्पण तसेच विविध शासकीय योजनांतील लाभार्थ्यांना लाभांचे वितरण तसेच वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमानंतर त्यांनी लाभार्थी शामराव सोनवणे यांच्या घरी भेट देऊन संवाद साधला.

## धुळे तालुक्यातील अतिवृष्टीमुळे शेकडो बाधीत कुटुंबांना मदतीची गरज – हिलाल माळी



धुळे – ३१ जुलै रोजी रात्री आणि दिवसा धुळे तालुक्यातील आंबोडे, नंदाळे, मुकटी, भिरडाई, कुंडाणे – वेल्हाणे, खोरदड आदी गावांमध्ये सततधार पावसामुळे अतिवृष्टी झाल्यामुळे सदर गावामध्ये शेतकऱ्यांचे व रहिवाशांचे प्रचंड नुकसान झाले आहे. आंबोडे गावातील एकाच घरातील आनंदा पारखे यांच्यासह त्यांचे तीन मुलं कनेर नदीला पूर आल्यामुळे वाहून गेले. त्या पैकी दोन जणांना वाचविण्यास यश आले आहे. आनंदा पारखे आणि त्यांचा मुलगा हे दोघे पिता-पुत्र चार दिवस उलटूनदेखील मिळून आले नाहीत. आपत्ती व्यवस्थापनाच्या पथकाने सतत शोधमोहीम राबवूनदेखील त्यांना आजपर्यंत यश आले नाही. म्हणून संपूर्ण गाव आजदेखील चिंतेत आहे. गावातील २०० ते ३०० घरांमध्ये पुराचे पाणी थेट शिरले आहे. त्यामुळे शेकडो कुटुंबांचे संसार उघड्यावर आले आहेत. घरातील अन्नधान्य, कपडे, महत्त्वाचे सामान पूर्णपणे ओले झाले असून काही ठिकाणी पुराच्या पाण्यात वाहून गेले आहे. या बाधित कुटुंबांना सध्या तात्काळ निवारा, अन्न व विशेष मदतीची गरज आहे.

तसेच दोघे पिता-पुत्र नदीच्या पुरात वाहून गेल्याने त्यांचा आजपर्यंत तपास नाही. शोधमोहीम राबवूनदेखील ते मिळून आले नाहीत. याचा अर्थ त्यांचे प्राण **(पान २ वर)**

## शासनाच्या विशेष मोहिमेअंतर्गत शाळांमध्ये अनिवार्य बायोमेट्रिक अपडेट शिबिरांचे उद्घाटन संपन्न



धुळे (जिमाका) – महाराष्ट्र शासनाच्या इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या अनिवार्य बायोमेट्रिक अपडेट (Mandatory Biometric Updation - MBU) विशेष मोहिमेचा शुभारंभ आज नोडल अधिकारी (आधार) तथा निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आले. आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्या दि. १७ जुलै २०२६ रोजीच्या निर्देशानुसार शाळांमधील प्रलंबित अनिवार्य बायोमेट्रिक अपडेट पूर्ण करण्यासाठी या विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व शाळांमधील ५ ते १५ वर्षे वयोगटातील प्रलंबित विद्यार्थ्यांचे चरपवरीू इळेशीीळल णर्विीळेप (चइण-१) करण्यात येणार आहे. तसेच १५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर अद्याप बायोमेट्रिक अपडेट न केलेल्या विद्यार्थ्यांचे Mandatory Biometric Updation (MBU-2) देखील या शिबिरांद्वारे करण्यात येणार आहे. सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व पालकांनी विशेष चइण अभियानादरम्यान शाळेत येणाऱ्या आधार केंद्रचालकांच्या माध्यमातून प्रलंबित असलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे बायोमेट्रिक अपडेट करून घ्यावे. तसेच पालकांनी शाळा प्रशासन व आधार केंद्रचालकांना आवश्यक सहकार्य करून ही मोहीम यशस्वी करावी. असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा नोडल अधिकारी (आधार) शरद पवार यांनी यावेळी केले. या कार्यक्रमास सेतू समन्वयक विजय पाटील, जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक दीपक पवार, जिल्हा समन्वयक राहुल वाघ, तांत्रिक सहाय्यक जावीद खान तसेच आधार केंद्रचालक संजय कुसळकर, अतुल देवरे आदी उपस्थित होते.

# संत नामदेव महाराज

संत नामदेव महाराज (जन्म: कार्तिक शुद्ध एकादशी शके ११९२ (इ.स.१२७०) समाधी: ३ जुलै १३५०) हे महाराष्ट्रातील वारकरी संतकवी होते. ते मराठी भाषांमधील सर्वाधिक जुन्या काळातील कवींपैकी एक होते. त्यांनी ब्रज भाषा भाषांमध्येही काव्ये रचली. शिखांच्या गुरु ग्रंथसाहिबातले चरित्रकार, आत्मचरित्रकार आणि 'कीर्तना'च्या माध्यमातून भागवत धर्म पंजाबपर्यंत नेणारे आद्य प्रचारक होते. त्यामुळे पंजाबी मंडळी तसेच संबंधित मंडळी आज त्यांच्या जन्मस्थानाचा नरसी (नामदेव) या गावाचा विकास करण्यासाठी धडपडत आहेत. नरसी (नामदेव) हे गाव महाराष्ट्रातील मराठवाड्यामधील हिंगोली जिल्ह्यातील असून तेथील संत नामदेव महाराज यांच्या मंदिराचा जीर्णोद्धार २०१९ला झाला.

भक्तशिरोमणी संत नामदेव हे संत ज्ञानेश्वरांच्या कालखंडात होऊन गेले. वारकरी संप्रदायाचे प्रचारक नामदेव महाराज नामवेदाचे व नामविद्येचे आद्य प्रणेते असलेले महाराष्ट्रातील हे एक थोर संत होत. आपल्या कीर्तनकलेमुळे प्रत्यक्ष पांडुरंगाला डोलायला लावणारी अशी त्यांची कीर्ती होती. संत नामदेव प्रत्यक्ष श्रीविठ्ठलाच्या निकटवर्ती असलेला सखा होता, असे मानले जाते. संत नामदेव हे वारकरी संप्रदायाचे महान प्रचारक असून भारतभर त्यांनी त्या बाबतीत भावनिक एकात्मता साधली. भागवत धर्माची पताका पंजाबपर्यंत घेऊन जाण्याचे कार्य त्यांनी स्वकर्तृत्वाने केले. त्यांचे आडनाव रेळेकर असे होते.

दामाशेट्टी हे संत नामदेवांचे वडील व गोणाई त्यांची माता होती. दामाशेटींचा व्यवसाय कपडे शिवणे हा होता, म्हणजे ते शिंपी होते. यांच्या अगोदरच्या सातव्या पिढीतील पुरुष यदुशेट हे सात्त्विक प्रवृत्तीचे भगवद्भक्त होते. सध्याच्या हिंगोली जिल्ह्यातील नरसी (नामदेव) हे संत नामदेवांचे जन्म गाव होय. नामदेवांचा जन्म प्रभव नाम संवत्सरात, शके ११९२ (इ.स.१२७०) मध्ये कार्तिक शुद्ध एकादशीस, रोहिणी नक्षत्रास, रविवारी झाला. संत नामदेवांना ८० वर्षांचे आयुष्य लाभले. त्यांचे बालपण हे पंढरपुरात गेले. त्यांनी लहानपणापासूनच श्रीविठ्ठलाची अनन्यसाधारण भक्ती केली. संत गोरा कुंभार यांच्याकडे, तेरढोकी येथे निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर महाराज, सोपानदेव, मुक्ताबाई, संत नामदेव, चोखामेळा, विसोबा खेचर आदी संतांचा मेळा जमला होता. याच प्रसंगी संत ज्ञानेश्वरांच्या विनंतीवरून गोरोबाकाकांनी उपस्थितांच्या आध्यात्मिक तयारीविषयी आपले मतप्रदर्शन केले होते. या प्रसंगानंतरच संत नामदेवांना विसोबा खेचर हे आध्यात्मिक गुरू म्हणून लाभले.

**विशेष लेख...**

पत्नी राजाई, मोठी बहीण आऊबाई; नारा, विठा, गोंदा, महादा हे त्यांचे चार पुत्र व एक मुलगी लिंबाई असा संत नामदेवांचा परिवार होता. त्यांच्या कुटुंबात एकूण पंधरा माणसे होती. स्वतःला 'नामयाची दासी' असे म्हणणाऱ्या संत जनाबाई या त्यांच्या परिवारातील एक सदस्य होत्या. संत नामदेवाची अभंगगाथा (सुमारे २५०० अभंग) प्रसिद्ध आहे. त्यांनी शौरसेनी भाषेत काही अभंग रचना (सुमारे १२५ पदे) केली. त्यातील सुमारे बासष्ट अभंग (नामदेवजीकी मुखबानी) शीख पंथाच्या गुरुग्रंथ साहेबमध्ये गुरुमुखी लिपीत घेतलेले आहेत. संत नामदेवांनी आदि, समाधी व तीर्थावळी किंवा तीर्थावली या गाथेतील तीन अध्यायांतून संत ज्ञानेश्वरांचे चरित्र सांगितले आहे. कीर्तनांत अनेक चांगल्या ग्रंथांचा उल्लेख असे. यावरून ते बहुश्रुत व अभ्यासू असल्याचे लक्षात येते. 'नामदेव कीर्तन करी, पुढे देव नाचे पांडुरंग'– अशी त्यांची योग्यता होती. 'नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी' हे त्यांच्या आयुष्याचे ध्येय होते.

भागवत धर्माचे एक आद्य प्रचारक म्हणून संत नामदेवांनी संत ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधीनंतर सुमारे ५० वर्षे भागवतधर्माचा प्रचार केला. प्रतिकूल परिस्थितीमध्ये महाराष्ट्राची भावनिक एकात्मता जपण्याचे अवघड काम त्यांनी केले. पंजाबमधील शीख बांधवांना ते आपले वाटतात. शीख बांधव 'नामदेव बाबा' म्हणून त्यांचे गुणगान गातात. पंजाबातील 'शबदकीर्तन' व महाराष्ट्रातील 'वारकरी कीर्तन' यांत विलक्षण साम्य आहे. घुमान (पंजाब) येथे शीख बांधवांनी त्यांचे मंदिर उभारले आहे. बहोरदास, लद्धिविष्णूस्वामी, केशव कलाधारी हे त्यांचे पंजाबी शिष्य होत. राजस्थानातील शीख बांधवांनीही नामदेवाची मंदिरे उभारलेली आहेत. ऋसंत शिरोमणी' असे यथार्थ संबोधन त्यांच्याबद्दल वापरले जाते.

भगवद्भक्तांच्या व साधु–संतांच्या चरण धुळीचा स्पर्श व्हावा म्हणून पंढरपूर येथील विठ्ठल मंदिराच्या महाद्वारी पायरीचा दगड होण्यात त्यांनी धन्यता मानली. संत नामदेव हे आषाढ वद्य त्रयोदशी, शके १२७२ मध्ये (शनिवारी, दि. ३ जुलै, १३५० रोजी) पंढरपूर येथे पांडुरंगचरणी विलीन झाले. नक्की दिनांकाविषयी एकवाक्यता दिसून येत नाही. संत नामदेव हे कीर्तने करत करत भारतभर फिरले.

नामदेव महाराज खूप लहान असताना, त्यांच्या वडिलांनी त्यांना सांगितले ऋआज देवाला प्रसाद तू दाखव. त्या दिवशी नामदेवांनी नुसता नेवैद्य दाखविला नाही तर देवापुढे वाट बघत बसले की केव्हा हा खाईल. त्या अत्यंत निरागस अपेक्षेला मान देऊन प्रत्यक्ष विठ्ठल प्रकट झाले व नामदेवांनी दिलेला प्रसाद त्यांनी ग्रहण केला. कुत्र्याने चपाती पळवली त्याला ती कोरडी खाऊ लागू नये म्हणून संत नामदेव महाराज, तुपाची वाटी घेऊन त्याच्यामागे लागले. एकदा महाशिवरात्रीच्या निमित्ताने संत नामदेव औंढा येथे नागनाथाच्या दर्शनासाठी गेले असता मंदिरात भजन/कीर्तन न करण्यास पुजाऱ्यांनी त्यांना विनवले. त्यांच्या विनंतीस मान ठेवून, नामदेव मंदिराच्या मागील बाजूस बसून दर्शनासाठी नागनाथाची आळवणी करू लागले. नामदेवाची भक्ती बघून त्यांना दर्शन देण्यासाठी देवाने पूर्वाभिमुख असलेले मंदिर फिरवून पश्चिमाभिमुख केले, ते आजतागायत तसेच आहे.

# 'एसएमबीटी' – 'स्वयं टॉक्स' यांच्या 'बियॉन्ड मेडिसीन' या संयुक्त उपक्रमातून मानवतेचा अमूल्य संदेश

## प्रेरणादायी जीवनप्रवासातून सामाजिक बांधिलकी

नंदी हिल्स – एखादा प्रश्न समोर उभा राहिला तर त्यावर मीच का उपाय शोधू नये? या जिद्दीतून सुरु झालेला प्रवास आज हजारो दिव्यांगांच्या आयुष्यात आशेचा किरण घेऊन आला आहे. एसएमबीटी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस अँड रिसर्च सेंटर येथे आयोजित 'स्वयं टॉक्स'च्या 'बियॉन्ड मेडिसिन' (इशूेपव चशवळलळपश) या विशेष उपक्रमात सामाजिक उद्योजक प्रशांत गाढे आणि 'सेवांकुर भारत'चे संस्थापक डॉ. अश्विनिकुमार तुपकरी यांच्या प्रेरक जीवनप्रवासाचा वेध घेण्यात आला. नविन काळे यांनी घेतलेल्या अत्यंत भावस्पर्शी आणि प्रेरक संवादातून आरोग्य सेवेतील मानवी मूल्ये आणि संवेदनशीलतेचे अनेक पैलू उलगडले. याप्रसंगी संस्थेचे बोर्ड मेंबर श्रीराम कुऱ्हे, अधिष्ठाता डॉ मीनल मोहगांवकर, उपअधिष्ठाता डॉ संदीप लांबे, व्यवस्थापन अधिकारी डॉ सौरभ पाटील यांच्यासह एसएमबीटी कॅम्पसमधील सर्व अधिष्ठाता, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांसह विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. रोबोटिक हाताची निर्मिती करणाऱ्या प्रशांत गाढे यांनी आपल्या सुरुवातीच्या संघर्षाच्या आठवणींना उजाळा दिला. एमआयटी (चखढ) सोडल्यानंतर त्यांच्यावर अनेकांनी टीका केली, मात्र ध्येयापासून ते विचलित झाले नाहीत. बाजारात अडीच लाख रुपयांना मिळणारा रोबोटिक हात सर्वसामान्यांना परवडणारा नव्हता. तो दर कमी करत १ लाख आणि पुढे २० हजारांपर्यंत आणला, तरीही तो गरिबांसाठी महागच होता. अखेर सर्व मार्ग बंद झाल्यावर 'पुढे जायचे असेल तर मागे खेचणारा रस्ता तोडून टाका' या विचाराने त्यांनी काम सुरु ठेवले. जयपूर येथील पपेट हाऊस आणि थ्रेड्स तंत्रज्ञानाचा अभ्यास करून सिलिकॉनचा वापर कमी करत त्यांनी अत्यंत माफक दरात अत्याधुनिक रोबोटिक हात विकसित केला. प्रशांत गाढे यांच्या या कार्याची दखल 'कोण बनेगा करोडपती'च्या व्यासपीठावर घेण्यात आली. ज्येष्ठ समाजसेविका सुधा मूर्ती यांनी प्रशांत यांच्या संशोधनाचे कौतुक करत 'इन्फोसिस फाउंडेशन' कायम पाठीशी राहील अशी ग्वाही दिली. पुढे 'मिलाप कॅम्पेन'द्वारे एक व्हिडिओ व्हायरल झाला, ज्याला तब्बल ८० दशलक्ष (८० मिलियन) व्ह्यूज मिळाले. या मोहिमेतून तब्बल ३ कोटी रुपयांचा निधी उभारण्यात यश आले. आजवर २० हजारांहून अधिक रोबोटिक हात गरजूंना पूर्णपणे मोफत देण्यात आले आहेत.

आपल्या अनुभवांबद्दल बोलताना प्रशांत गाढे म्हणाले, रुग्ण आणि डॉक्टर यांच्यातील नातं केवळ उपचारापुरतं मर्यादित न राहता त्यात मानवी संवेदना असली पाहिजे. आयुष्यात कितीही अडचणी आल्या तरी तिथेच राहून सामना केला तर स्वप्न नक्की पूर्ण होते. आपण जे काम करतो, त्यालाच फळ मानणे हे सर्वात महत्त्वाचे आहे. अमेरिकेतून परतताना त्यांनी १० विशेष मशीन्स आणल्या असून फ्युचर फाऊंडेशनच्या मदतीने हे कार्य अधिक व्यापक केले जात आहे. दुसऱ्या सत्रात डॉ. अश्विनिकुमार तुपकरी यांनी आरोग्य सेवेतील सेवाभावी वृत्तीवर प्रकाश टाकला. मला रोज तेच तेच साचेबद्ध काम करायला आवडत नाही. 'थिंक ग्लोबली, क्ट लोकली' या सूत्राप्रमाणे देशाच्या कानाकोपऱ्यातील रुग्णाला आपल्याच मातीत योग्य उपचार मिळाले पाहिजेत. परदेशी मॉडेल असलेल्या हॉस्पिटल्सच्या साखळीपेक्षा (चेन) आपल्या देशाच्या मातीशी सुसंगत अशी आरोग्य व्यवस्था निर्माण होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. डॉ. तुपकरी यांनी सुखदेव नारायण नवले यांच्यासोबतच्या सहवासातून 'सेवांकुर'ची बीजे कशी रोवली गेली, हे सांगितले. गावात वर्गणी जमा करून शिक्षण घेतलेल्या किरण नावाच्या विद्यार्थ्याचा दाखला त्यांनी दिला. विद्यार्थ्यांच्या कॅम्पमध्ये आलेल्या किरणच्या आई–वडिलांना जेव्हा विमानाने नेण्यात आले, तेव्हा त्यांच्या डोळ्यातील आनंद अविस्मरणीय होता. अभावाची जाणीव असणे आणि जिथे काही नाही तिथे संवेदनशीलतेचे दर्शन घडवणे हेच खऱ्या सेवेचे मूळ आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. वैद्यकीय व्यवसायात सेवा करण्याची संधी आणि चरितार्थ चालवणे या दोन्ही गोष्टी एकत्र साधता येतात. संवेदनशीलता ही केवळ शब्दांत नसून अभावाचे दर्शन झाल्यावरच ती निर्माण होते, असे मत डॉ. तुपकरी यांनी व्यक्त केले. तरुण वैद्यकीय विद्यार्थ्यांनी 'वन वीक फॉर नेशन' (जपश थशशज्ञ षेी छरींळेप) आणि 'वन अव्हर फॉर नेशन' (जपश र्हेीी षेी छरींळेप) या उपक्रमांत सहभागी होऊन सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. जे माझ्याकडे आहे आणि दुसऱ्याकडे नाही, ते देण्याची नियत असली पाहिजे. अभावाच्या मागे असलेला अभाव पाहण्याची ताकद आपल्यात निर्माण झाली की सेवेचा मार्ग आपोआप सुकर होतो असे डॉ. अश्विनिकुमार तुपकरी यांनी सांगत सेवांकुर उभ राहण्यामागचा उद्देश आणि प्रवास उलगडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि दिलखुलास मुलाखत नविन काळे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत पार पाडली. एसएमबीटी ऑडिटोरियममध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमाला वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थी, डॉक्टर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. वैद्यकीय शिक्षण केवळ पुस्तकी ज्ञान आणि तांत्रिक उपचारापुरते मर्यादित नसून, रुग्णांप्रती असणारी सहानुभूती, सामाजिक जबाबदारी आणि प्रभावी संवादकौशल्य हा त्याचा खरा आत्मा आहे. काही दशकांपूर्वी वैद्यकीय सेवा देताना 'रुग्णामधील व्यक्तीला समजून घेणे' हा मूळ विचार होता, जो आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञान–आधारित वैद्यकीय युगात कुठेतरी मागे पडत चालला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून आपल्याला याच मानवी मूल्यांचा पुनर्शोध घ्यायचा आहे. स्वयं टॉक्स सोबत झालेल्या 'बियॉन्ड मेडिसीन' या सामंजस्य करारामध्ये (चेण) विद्यार्थ्यांना विद्यार्थी प्रतिक्रिया तसेच विद्यार्थ्यांचे प्रवास वर्णन त्यांचे ग्रुप्स तसेच या क्षेत्रात मध्ये काम करणाऱ्या प्रभावी व्यक्तिमत्त्वांची भेट असे उपक्रम वर्षभर राबवले जातील. विद्यार्थ्यांना भविष्यात केवळ कुशलच नव्हे, तर संवेदनशील आणि सामाजिक भान असलेले डॉक्टर घडवण्यासाठी हा करार अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरेल.

(पान १ वरून) **हिलाल माळी...**

निश्चितपणे धोक्यात आले आहेत. परिवाराचा पोशिंदा पुरबळी ठरल्याने त्यांचा आधारच नाहिसा झाला आहे. म्हणून शासनाच्या आपत्ती व्यवस्थापनाच्या नवीन धोरणानुसार आनंदा पारखे यांच्या परिवाराला तात्काळ आर्थिक मदत घोषित करावी. शेती पिकांचे, खाजगी मालमत्तेचे व शासनाच्या मालमत्तेचे प्रचंड नुकसान झालेले असून त्यामध्ये नदीकाठच्या शेतातील पिके तसेच शेतातील संपूर्ण माती खरडून वाहून गेल्याने संपूर्ण नदीकाठावरील जमिनी उद्ध्वस्त झाल्या आहेत. तसेच शेतकऱ्यांच्या पशुधनाचे व मालमत्तेचे मोठे नुकसान झालेले आहे. या सर्व शेतकरी बांधवांना शासनाच्या नवीन निकष व धोरणानुसार त्या अंतर्गत पंचनामे करून भरीव मदत मिळावी. तरच त्या भागातील शेतकरी बांधवांना दिलासा मिळेल.

नंदाळे गावातील, मुकटी गावातील शेतकरी बांधवांसाठी त्यांच्या शेतात जाण्यासाठी नदीवर असलेला मोरी पूल मार्ग हा पूर्णपणे पुराच्या पाण्यात उखडून वाहून गेल्यामुळे शेतकरी बांधवांचा शेतावर जाण्याचा संपर्क पूर्णपणे तुटला आहे. म्हणून पुरात उद्ध्वस्त झालेले पूल जलद गतीने नवीन प्रस्ताव सादर करून तयार करावेत. अशा प्रकारे वरील सर्व गावांमध्ये शेतकरी बांधव मोठ्या चिंतेत आहेत. शासन आणि प्रशासन त्यांना भरीव मदत करेल, याकडे ते आशेने टक लावून वाट पाहत आहेत. म्हणून महोदय, आपण या आपत्तीची दखल घेऊन शासनाकडे जलद गतीने पाठपुरावा करून संबंधित शेतकरी बांधवांना दिलासा देण्यास नम्र विनंती आहे, असे पत्रक हिलाल माळी यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

# जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांची अंबोडे गावाला भेट





धुळे (जिमाका) – धुळे तालुक्यातील अंबोडे गावास जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी भेट देऊन पूरग्रस्त भागाची पाहणी केली. तसेच गावातील नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व नुकसानीची माहिती जाणून घेतली. पूरग्रस्तांना शासनाकडून नियमानुसार आवश्यक ती सर्व मदत उपलब्ध करून देण्यात येईल, असे ही त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर, उपविभागीय अधिकारी रोहन कुवर, तहसीलदार अरुण शेवाळे, सहायक पोलीस निरीक्षक धनंजय पाटील आदी उपस्थित होते. धुळे जिल्ह्यात गेल्या २ दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे धुळे तालुक्यातील अंबोडे येथे कनेर नदीला पूर आल्याने नदीकाठी असलेल्या दुकानात असताना एकाच कुटुंबातील चार जण पुराच्या पाण्यात अडकले. घटनेची माहिती मिळताच जिल्हा प्रशासन, पोलीस, एसडीआरएफ बचाव पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली. बचावकार्यात महेश आनंदा पारखे व उमेश आनंदा पारखे यांची सुखरूप सुटका करण्यात आली. आनंदा पारखे व दिनेश पारखे वाहून गेले. त्यांचा शोध सुरू आहे. तसेच अंबोडे गावातील ग्रंथालयात अभ्यासासाठी गेलेले सुमारे १० ते १२ विद्यार्थी पुरामुळे एकविरा माता मंदिराच्या गच्चीवर अडकून पडले होते. एसडीआरएफ, पोलीस व ग्रामस्थांच्या मदतीने या सर्व विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. तसेच मुकटी येथील कनेर नदीपात्रात झाडाजवळ अडकलेल्या आठ मुलांचीही ग्रामस्थांच्या मदतीने सुखरूप सुटका करण्यात आली. घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी अंबोडे गावास भेट देऊन पूरग्रस्त भागाची पाहणी केली. त्यांनी नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. तसेच संबंधित यंत्रणांना पंचनामे करून त्वरीत मदत देण्याच्या सूचना दिल्या. पुर प्रभावित नागरिकांना आरोग्याची समस्या उद्भवनार नाही, तसेच त्यांचे तात्पुरते स्थलांतर केल्यानंतर त्यांना सर्व आवश्यक सोई सुविधा मिळतील याची कटाक्षाने दखल घ्यावी, असे देखिल निर्देश संबंधीत यंत्रणांना दिले. जिल्हा प्रशासनाकडून बचाव व मदतकार्य सुरू असून नागरिकांनी नदी, नाले व पूरग्रस्त भागाजवळ जाणे टाळावे. तसेच प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्ह्यातील दूध उत्पादनास गतवैभव प्राप्त करून देणार–पालकमंत्री जयकुमार रावल

## दादासाहेब रावल शिंदखेडा तालुका दूध उत्पादक संघाच्या नवीन प्रकल्पाचे भूमिपूजन

धुळे (जिमाका) – जिल्ह्यातील दुग्ध व्यवसायाला नवसंजीवनी देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. दादासाहेब रावल शिंदखेडा तालुका दूध उत्पादक कृषी पूरक उद्योग सहकारी संघ लिमिटेड ,दोंडाईचा संघाच्या नवीन प्रकल्पामुळे जिल्ह्यातील दूध उत्पादन वाढून दुग्ध व्यवसायाला पुन्हा गतवैभव प्राप्त होईल, असा विश्वास राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केला. रावल शिंदखेडा तालुका दूध व दूधजन्य प्रक्रिया प्रकल्प भूमिपूजन सोहळा झाला. यावेळी पालकमंत्री श्री. रावल बोलत होते. यावेळी आमदार मंजुळाताई गावित, आमदार राघवेंद्र पाटील, आमदार अनुपभैय्या अग्रवाल, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी कुलगुरू डॉ. विलास खर्चे, महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरचे कुलगुरु डॉ. नितीन पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, नगरसेविका सुभद्रादेवी रावल, संस्थेचे चेअरमन रघुवीर बागल व्हाईस चेअरमन महेंद्र निकम आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. रावल म्हणाले, सहकार महर्षी दादासाहेब रावल यांनी सन १९६८ मध्ये स्थापन केलेल्या दूध संघाने शिंदखेडा तालुक्यासह परिसरातील शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य दिले. दुष्काळी परिस्थितीतही दूध व्यवसायामुळे शेतकऱ्यांना नियमित उत्पन्नाचा आधार मिळाला. राज्यातील अग्रगण्य दूध संघ म्हणून या संघाची ओळख होती. मात्र बदलत्या परिस्थिती व स्पर्धेमुळे संघ अडचणीत आला. आता या संघाचे पुनरुज्जीवन करण्याचा संकल्प करण्यात आला असून नवीन प्रकल्प त्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. ते म्हणाले, जिल्ह्यातील अल्पभूधारक, भूमिहीन व सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी दुग्ध व्यवसाय हा उत्पन्नाचा प्रभावी पर्याय आहे. दूध संकलन, प्रक्रिया, मूल्यवर्धन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दुग्ध व्यवसाय अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

दूध संघाच्या संचालक मंडळाने संघाला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी विकासाभिमुख निर्णय घ्यावेत. यशस्वी दूध संघांच्या धर्तीवर आधुनिक प्रकल्प उभारून शेतकऱ्यांना अधिकाधिक लाभ मिळवून द्यावा, असे आवाहनही पालकमंत्री श्री. रावल यांनी केले. या नवीन प्रकल्पामुळे दूध संकलन क्षमता वाढण्यास, दुग्धजन्य पदार्थांच्या निर्मितीला चालना मिळण्यास तसेच जिल्ह्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले की, दुग्धजन्य पदार्थांवर प्रक्रिया करून त्यांचे मूल्यवर्धन केल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल. केवळ दूध उत्पादन करून चालणार नाही, तर त्यावर प्रक्रिया करून विविध दुग्धजन्य



पदार्थांची निर्मिती आणि प्रभावी विपणन करणे काळाची गरज आहे. नवीन दुग्ध व दुग्धजन्य प्रक्रिया प्रकल्पाची सुरुवात ही महत्त्वाची असून, या माध्यमातून दूध अधिक काळ साठवून त्यापासून विविध दर्जेदार उत्पादने तयार करून देश–विदेशातील बाजारपेठांपर्यंत पोहोचविता येतील.शेळीच्या दुधामध्ये विशेष पोषणमूल्य असून अनेक ग्राहकांकडून त्याला मागणी आहे. शेळीच्या दुधावर प्रक्रिया करून त्याचे योग्य मूल्यवर्धन व प्रभावी विपणन केल्यास शेतकरी आणि दूध उत्पादकांना मोठा आर्थिक लाभ मिळू शकतो, असेही त्यांनी सांगितले. या प्रकल्पास महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठामार्फत संशोधन, तांत्रिक मार्गदर्शन आणि आवश्यक सहकार्य देण्याची ग्वाही डॉ. पाटील यांनी दिली. यावेळी विविध मान्यवर, लोकप्रतिनिधी, अधिकारी, दूध संघाचे पदाधिकारी, संचालक, दूध उत्पादक शेतकरी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धुळे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील–पालकमंत्री जयकुमार रावल

धुळे (जिमाका) – धुळे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, सिंचन, उद्योग या त्रिसूत्रीनुसार प्रयत्न करण्यात येतील, असे प्रतिपादन राज्याचे राजशिष्टाचार व पणन तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले. दोंडाईचा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये प्रशासकीय भवनच्या लोकार्पण सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री श्री. रावल बोलत होते. यावेळी आमदार काशीराम पावरा, आमदार मंजुळाताई गावित, आमदार राघवेंद्र पाटील, आमदार अनुपभय्या अग्रवाल, महापौर मायादेवी परदेशी,महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी कुलगुरु डॉ. विलास खर्चे, महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर कुलगुरु डॉ. नितीन पाटील,नगराध्यक्ष नयनकुवरताई रावल, बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, उद्योगपती सरकारसाहेब रावल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे आदी उपस्थित होते. यावेळी राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ध्वनिचित्रफित संदेश दाखविण्यात आला. त्यांनी या कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. तसेच दोंडाईचा कृषी उत्पन्न बाजार समिती, दूध प्रक्रिया संघावर आधारित चित्रफित दाखविण्यात आली. पालकमंत्री श्री. रावल म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे धुळे जिल्ह्याच्या विकासासाठी नेहमीच सहकार्य राहिले आहे. तापी नदीवर सुलवाडे, सारंगखेडा आणि प्रकाशा बॅरेज निर्माणझाले. सुलवाडे बॅरेजमधून पाणी जामफळ धरणात टाकत आहोत. त्यामुळे आगामी काळात धुळे व शिंदखेडा तालुक्यातील ५० हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येईल. तसेच सिंचनाची शाश्वत सुविधा निर्माण करण्यासाठी कटिबध्द आहोत. शेतमाल विक्रीसाठी बाजार समित्यांचे सक्षमीकरण करण्यात येत आहे. त्यासाठी पणन विभागाने पुढाकार घेतला आहे. दोंडाईचा कृषी उत्पन्न बाजार समिती दीपस्तंभाप्रमाणे काम करेल. धुळे महानगरात ३५ कोटी रुपये खर्चून भव्य व्यापारी संकुल उभे राहत आहे. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुध प्रक्रिया उद्योगांची उभारणी केली जात आहे.

तापी नदीत बारमाही पाणी राहते. तेथे मत्स्य पालनासाठी प्रयत्न केले जातील. तसेच सरकारसाहेब रावल यांनी कृषी, उद्योग, शिक्षण या क्षेत्रांत सातत्याने काम केले. त्यांचे काम दीपस्तंभासारखे आहे, असेही पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले. आमदार श्री भदाणे, उद्योगपती श्री. रावल यांनी मनोगत व्यक्त केले. बाजार समितीचे सभापती श्री. पाटील यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी सांगितले की, पालकमंत्री श्री. रावल यांच्या मार्गदर्शनाखाली बाजार समितीची यशस्वी वाटचाल सुरू आहे. यावेळी लोकप्रतिनिधी, विविध विभागांचे अधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धुळे जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील रिक्त आपले सरकार सेवा केंद्रांच्या मंजुरीच्या निकषात बदल

धुळे (जिमाका) – धुळे जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील रिक्त आपले सरकार सेवा (महा ई-सेवा) केंद्रांच्या मंजुरीसाठी दि. ३० जानेवारी, २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीतील निकषांमध्ये बदल करण्यात आला आहे, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी तथा सचिव, जिल्हा सेतू समिती शरद पवार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

यापूर्वी, जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील रिक्त आपले सरकार सेवा (महा ई-सेवा) केंद्रांच्या मंजुरीसाठी दि. २ जून, २०२५ च्या शासन निर्णयानुसार उमेदवारांना गुण देऊन निवड प्रक्रिया राबविण्यात येणार होती. मात्र, महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत देण्यात आलेल्या सूचनांनुसार महाराष्ट्र शासनाच्या इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि. ९ जुलै, २०२६ रोजी शुद्धीपत्रक जारी केले आहे. या शुद्धीपत्रकानुसार केंद्र शासनाच्या उडउ २.० अंतर्गत आपले सरकार सेवा केंद्रांबाबतच्या मार्गदर्शक सूचनांमधील तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार, धुळे जिल्ह्यातील रिक्त आपले सरकार सेवा (महा ई-सेवा) केंद्रांसाठीची निवड प्रक्रिया दि. ९ जुलै, २०२६ रोजीच्या शुद्धीपत्रकातील सुधारित गुणांकन निकषांनुसार राबविण्यात येणार आहे. याबाबतची सविस्तर सूचना धुळे जिल्ह्याच्या www.dhule.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असून, संबंधित अर्जदारांनी त्याची नोंद घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा सचिव, जिल्हा सेतू समिती शरद पवार यांनी केले आहे.

# लाळखुरकूत रोगप्रतिबंधक लसीकरण मोहिमेला १३ ऑगस्टपासून होणार सुरुवात

पुणे – लाळखुरकूत या घातक विषाणूजन्य रोगापासून राज्यातील पशूधनाचे रक्षण करण्यासाठी पशुसंवर्धन विभागातर्फे 'लाळखुरकूत (एफएमडी) लसीकरण मोहीम फेरी-९' चे आयोजन करण्यात आले आहे. ही लसीकरण मोहीम येत्या १३ ऑगस्ट २०२६ पासून राज्यभरात सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या मोहिमेसाठी १ कोटी लसमात्रा केंद्र शासनाकडून राज्यस्तरावर प्राप्त झाल्या आहेत. लाळखुरकूत रोगप्रतिबंधक लसीकरण मोहीम राज्यभरात वेळेत व यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी प्रत्यक्ष लसीकरण सुरु होण्यापूर्वी सर्व जिल्ह्यांपर्यंत लस साठा पोहोचणे आवश्यक आहे. उपलब्ध झालेला १ कोटी लसींचा पुरवठा राज्यातील सर्व जिल्ह्यांना शीत साखळीची खबरदारी घेऊन वितरित (वाटप) करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. या मोहिमेमुळे राज्यातील कोट्यवधी पशूधनाला लाळखुरकत रोगापासून संरक्षण मिळणार असून, पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार आहे. परिणामकारक लसीकरण होण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत पशुधनाचे जंतनिर्मुलन करण्यात येत असून, आवश्यक औषधींचा पुरवठा सर्व संस्थांना करण्यात आला आहे. महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाकडे नोंदणीकृत असलेल्या सर्व खाजगी कृत्रिम रेतन तंत्रज्ञांना केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत पशुधनाला एफएमडी लसीकरण करून त्याची नोंद NDLM वर घेतल्यास प्रती पशुधन रु. ५/- प्रमाणे प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे. राज्यातील पशुधन रोगांपासून सुरक्षित ठेवणे व पशुपालकांचे आर्थिक नुकसान टाळणे यासाठी 'लाळखुरकत (एफएमडी) लसीकरण मोहीम फेरी-९' अत्यंत महत्त्वाची आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये १३ ऑगस्टपासून ही मोहीम व्यापक स्वरूपात राबवली जाईल. सर्व पशुपालकांनी आपल्या पशुधनाचे १००% लसीकरण करून घेऊन या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा.

– मा.डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.), आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य.

# मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजनेसाठी अर्ज सादर करावेत

धुळे (जिमाका) – महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळामार्फत सन २०२६ –२०२७ या आर्थिक वर्षांसाठी शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना राबविण्यात येत असून, या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक गंगाधर डोईफोडे यांनी केले आहे. या योजनेंतर्गत उच्च शिक्षणासाठी राज्यांतर्गत, देशांतर्गत तसेच परदेशातील अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या इतर मागासवर्गीय (ओबीसी) विद्यार्थ्यांना बँकेमार्फत देशांतर्गत अभ्यासक्रमासाठी १० लाख रुपये व परदेशी अभ्यासक्रमासाठी २० लाख रुपये पर्यंत शैक्षणिक कर्ज उपलब्ध करून दिले जाते. विद्यार्थ्यांनी घेतलेल्या कर्जावरील १२ टक्क्यांपर्यंतचे व्याज अनुदान महामंडळामार्फत त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यात जमा केले जाते. योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी https://msobcfdc.org/ या संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदणी करून अर्ज सादर करावा. महामंडळाकडून LOI (Letter of Intent) प्राप्त झाल्यानंतर बँकेतून शैक्षणिक कर्ज मंजूर करून त्याची माहिती पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच दरमहा बँकेत व्याजाचा हप्ता भरल्यानंतर त्याचा व्याज दावा (Interest Claim) पोर्टलवर अपलोड करणे अनिवार्य आहे.

फोटो, पॅनकार्ड, आधारकार्ड (पालकांचे व अर्जदार यांचा फोटो, आधारकार्ड, पॅनकार्ड, पालकांचे किंवा अर्जदार सिबिल स्कोअर, रेशन कार्ड, जातीचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला (वयोमर्यादा १७ ते ३०वर्ष), रहिवासीचा पत्ताकरीता गॅसकार्ड / लाइट बिल/पासपोर्ट, डोमीसाइल, नॉन क्रिमीलेअर, बँक पास बुक, १२ वी मार्कशीट (किमान ६० टक्के गुण आवश्यक), कॉलेजचे बोनाफाईड, कॉलेजचे fees structure,

QS (Quacquarelli symbonds रँकींग / गुणवत्ता निकषानुसार प्रवेश घेनलेल्या संस्थेचे स्थान २०० पेक्षा आतील Graduate Record Exam, (GRE), Test of English as Foregin Language (TOFEL) परीक्षा उत्तीर्ण). कर्ज योजनेचा लाभ घेण्यासाठी महामंडळांच्या https://msobcfdc.org/ या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल. योजनेच्या अधिक माहितीसाठी जिल्हा कार्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सिंचन भवन मागे, साक्री रोड, धुळे दुरध्वनी क्र.०२५६२-२७८४९७ येथे संपर्क साधावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक श्री. डोईफोडे यांनी केले आहे.

# नीट परीक्षेत कु. श्रुती मिरेचे घवघवीत यश; वैद्यकीय प्रवेश निश्चित



राष्ट्रीय पात्रता परीक्षा म्हणजेच 'नीट' (NEET) परीक्षेत येथील कु. श्रुती सुभाष मिरे हिने चमकदार कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले आहे. तिच्या या यशामुळे मिरे परिवारासह सर्वच स्तरातून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.कु. श्रुती ही शहरातील प्रसिद्ध वैद्यकीय व्यावसायिक डॉ. सुभाष मिरे आणि डॉ. शशिकला मिरे या दांपत्याची सुकन्या आहे. तिने अत्यंत खडतर आणि प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या नीट परीक्षेत ४६५ गुण मिळवून ९२.८९ पर्सेंटाइल गुणांसह उत्तम यश पटकावले आहे. तिच्या या उत्कृष्ट गुणांमुळे तिचा वैद्यकीय शिक्षणाचा (Medical Admission) मार्ग मोकळा झाला असून, तिचा मेडिकल कॉलेजमधील प्रवेश निश्चित झाला आहे.आई-वडिलांच्या वैद्यकीय क्षेत्रातील वारसा पुढे चालवत श्रुतीने मिळवलेले हे यश अत्यंत कौतुकास्पद आहे. तिने आपल्या यशाचे श्रेय तिचे आई-वडील, मार्गदर्शक शिक्षक आणि तिच्या कष्टाला दिले आहे. श्रुतीच्या या यशाबद्दल शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाचे सोशल मिडिया राज्यप्रमुख संजम कुसळकर, धुळे जिल्हा वडार समाजाचे नेते राजु सुर्यवंशी आदिनी अभिनंदन केले असून, तिच्या पुढील वाटचालीस व भावी वैद्यकीय कारकिर्दीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# *श्री जयकुमार रावल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या प्रस्तावित इमारतीचे भूमिपूजन संपन्न*

धुळे (जिमाका) – शिक्षणमहर्षी दादासाहेब रावल यांच्या शैक्षणिक कार्यातून हजारो विद्यार्थ्यांना ज्ञानदान मिळणार असून, या माध्यमातून सक्षम, सुसंस्कृत आणि राष्ट्रनिर्मितीसाठी योगदान देणारी नवी पिढी घडेल, असे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले. दोंडाईचा येथे श्री जयकुमार रावल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या प्रस्तावित इमारतीच्या भूमिपूजन समारंभात ते बोलत होते. यावेळी आमदार राघवेंद्र पाटील, आमदार अनुपभैय्या अग्रवाल, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी कुलगुरू डॉ. विलास खर्चे, महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर कुलगुरू डॉ. नितीन पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, नगरसेविका सुमद्रादेवी रावल आदी उपस्थित होते.पालकमंत्री रावल म्हणाले की, विद्यार्थी संस्था ही मुळातच शिक्षणासोबत स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणा देणारी संस्था म्हणून स्थापन झाली. या संस्थेच्या माध्यमातून हजारो विद्यार्थी घडले असून, भविष्यातही हजारो विद्यार्थी घडतील. शिक्षणाचे आणि ज्ञानदानाचे हे अत्यंत मोठे कार्य आहे. जगात भारताला महासत्ता बनवायचे असेल, तर शिक्षण हा त्याचा सर्वात महत्त्वाचा पाया आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत भारताला विकसित आणि महासत्ता राष्ट्र बनविण्याचा संकल्प केला आहे. त्या संकल्पपूर्तीसाठी आपल्या मुलांना दर्जेदार शिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे. सुमारे सहा लाख चौरस फूट क्षेत्रफळाच्या प्रस्तावित इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटच्या इमारतीचे भूमिपूजन होत असून, हा धुळे जिल्ह्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. या संस्थेसाठी अडीचशे एकर जागा उपलब्ध आहे. सहकारमहर्षी दादासाहेब रावल यांनी सन १९५२ मध्ये ८० एकर जागा संस्थेला दान दिली. त्या काळातील त्यांच्या दूरदृष्टीमुळे या संस्थेचा भक्कम पाया तयार झाला आहे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने दादासाहेब रावल एज्युकेशन सिटी उभी राहिली. धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी ही संस्था शिक्षणाचे महत्त्वपूर्ण केंद्र बनली आहे. सन १९२१ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेने शतकाहून अधिक काळ शिक्षणाबरोबरच राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी आणि संस्कारांची परंपरा जोपासली आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे म्हणाले की, सन १९२१ मध्ये स्थापन झालेली ही संस्था शतकाहून अधिक काळ दुर्गम भागात शिक्षणाची अखंड ज्योत तेवत ठेवत आहे. विविध शाखांतील महाविद्यालयांचा समावेश असलेले हे शैक्षणिक संकुल दूरदृष्टीतून उभारले गेले असून, या भागात शिक्षणाचे प्रभावी जाळे निर्माण करण्यात संस्थेचे मोठे योगदान आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कृषी महाविद्यालयही या संकुलात कार्यरत आहे. तेथे शैक्षणिक, संशोधन आणि कृषीविषयक उपक्रम अत्यंत चांगल्या पद्धतीने राबविले जात असल्याचे समाधानकारक चित्र दिसून आले. या भागातील शेतकरी आणि विद्यार्थ्यांसाठी हे शैक्षणिक संकुल अत्यंत महत्त्वाचे आहे, असेही त्यांनी सांगितले

# क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



धुळे (जिमाका) – क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. अप्पर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर यांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी संजय बागडे, सहायक महसूल अधिकारी विजय बावा यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

हे मराठी साप्ताहिक, प्रकाशक संजय अण्णा कुसळकर यांनी मुद्रक अब्दुल मलिक मोहम्मद शरीफ अन्सारी यांच्या न्यू शार्प ऑफसेट प्रिंटर्स, अप्सरा हॉटेल, नवीन बस स्टॅण्ड समोर, मालेगांव, जि. नाशिक येथे छापून सा. 'प्रजा न्याय' कार्यालय – घर नं. २६, चक्करबर्डी, शासकीय दूध डेअरी रोड, पाण्याच्या टाकीजवळ, धुळे – ४२४ ००१ येथून प्रकाशित केले आहे. संपादक, मालक, संजय अण्णा कुसळकर – भ्रमणध्वनी – ९४२२७९८०९३ / ९०२८१३६९५३. Email - kusalkars@gmail.com / prajanyay@gmail.com (कायदेशीर सल्लागार – ॲड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी)
(या वृत्तपत्रातील लिखानाशी मालक/प्रकाशक/संपादक सहमत असतीलच असे नाही.) (कोणताही वाद धुळे न्यायालयांतर्गत)